लोकमता पान-१०

# गुजरातमध्ये मांजाचे सहा बळी

## तीन मुलांचा समावेश, अनेक घटनांत १७६ जखमी

पीटीआय, अहमदाबाद

**गुजरातमध्ये** उत्तरायण सणानिमित्त उडविण्यात आलेल्या पतंगांच्या मांज्याने गळा चिरला जाऊन तीन मुलांसह सहा जणांचा मृत्यू झाला. तसेच विविध घटनांत मांज्यामुळे शरीराचा भाग कापला गेल्याने आणि उंचावरून कोसळल्याने १७६ जण जखमी झाले.

अनेक जण पतंग उडवण्यासाठी धारदार मांजा वापरतात. त्यामुळे गळा चिरल्याने वेगवेगळ्या घटनांत सहा जण मृत्युमुखी पडले. भावनगर शहरात वडिलांसोबत दुचाकीवरून जात असलेल्या दोन वर्षांच्या कीर्तीचा गळा मांजामुळे कापला गेला. रविवारी रुग्णालयात उपचारादरम्यान तिचा मृत्यू झाला. दुसऱ्या घटनेत विसनगर शहरात तीन वर्षांची किस्मत आईसह घरी जात असताना मांज्याने तिचा गळा चिरला. पोलीस अधिकाऱ्याने सांगितले, की या मुलीला रुग्णालयात नेण्यात आले. मात्र डॉक्टरांनी तिला मृत घोषित केले.

अन्य एका घटनेत सात वर्षीय ऋषभ वर्मा पतंग खरेदी करून आई-वडिलांसह दुचाकीवरून जात असताना राकजोत येथे मांज्यामुळे त्याचा गळा कापला गेल्याने त्याचा मृत्यू झाला.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार बडोदा, कच्छ आणि गांधीनगर जिल्ह्यांतही अशाच घटना घडल्या आहेत. दुचाकीवरून प्रवास करताना मांजाने गळा चिरल्याने तिघांना जीव गमवावा लागला. आपत्कालीन रुग्णवाहिका सेवेने संकलित केलेल्या आकडेवारीनुसार शनिवारी आणि रविवारी पतंग उडवताना मांज्यामुळे शरीराचा भाग कापला गेल्याने १३० जण, तर उंचावरून कोसळल्याने ४६ जण जखमी झाले. पतंग उडवण्यामुळे अपघातांचे प्रमाणही वाढले. १५ जानेवारीला ४६१ आणि १४ जानेवारीला ८२० रस्ते अपघात झाले.

### मुंबईत जखमी झालेल्या १८ पक्ष्यांना जीवदान

मुंबई : गेल्या दोन दिवसांत मांजामुळे १८ पक्षी जखमी झाले. त्यांना पक्षीप्रेमींनी जीवदान दिले आहे. गेल्या दोन दिवसांत मीरा रोड, ठाणे, मुलुंड, भांडुप, पवई, बोरिवली आणि मलबार हिल या ठिकाणी अनेक पक्षी जखमी अवस्थेत आढळून आले. आंतरराष्ट्रीय प्राणी संरक्षण संस्था, अम्मा केअर फाउंडेशन, तसेच प्लांट अँड अॅनिमल वेल्फेअर सोसायटी – मुंबई या संघटनांनी जखमी पक्ष्यांवर उपचार केले. पशुवैद्य डॉ. मनीष पिंगळे, डॉ. राहुल मेश्राम यांच्या सहकार्याने एक पळस मैना, एक छोटा शरटी, पाच घारी आणि ११ कबुतरांवर उपचार करण्यात आले.

---

लोकसत्ता पु. ११.४

# न्याय न मिळाल्यास महिलेचा आत्मदहनाचा इशारा

### बाळाचा हात गमवाल्याचे प्रकरण

लोकसत्ता विशेष प्रतिनिधी

**वसई :** नालासोपारामधील अंजली वाला यांच्या बाळाचा हात कापावा लागला होता. या प्रकरणात स्थानिक रुग्णालयाच्या डॉक्टरांची चूक नसल्याचा अहवाल जिल्हा शल्यचिकित्सकांनी दिली आहे. या अहवालाविरोधात वाला यांनी आरोग्य मंत्र्यांकडे दाद मागितली असून, न्याय न मिळाल्यास मंत्रालयासमोर आत्मदहनाचा इशारा दिला आहे. शल्यचिकित्सकांनी रुग्णालयाशी संगनमत करून अहवाल बनवला आहे, असा आरोप वाला यांनी केला आहे.

अंजली वाला या ४ नोव्हेंबर रोजी नालासोपारा येथील त्रिवेणी रुग्णालयात प्रसूतीसाठी दाखल झाल्या होत्या. त्यांनी दोन जुळ्या बाळांना जन्म दिला. मात्र, एका बाळाची शुगर कमी असल्याचे सांगत डॉक्टरांनी त्याला सलाइन लावले व थोड्याच वेळात बाळाचा हात पूर्ण काळा पडत गेला. बाळाच्या तब्येतीत सुधारणा होत नसल्याने पालकांनी त्याला मुंबईतील वाडिया रुग्णालयात नेले होते. यावेळी बाळाच्या हाताला गँगरीन झाले असल्याचे सांगत बाळाचा पूर्ण हात कापावा लागला.

या बाबत अंजली वाला यांनी तक्रार केली होती. त्रिवेणी रुग्णालयाच्या डॉक्टरांच्या निष्काळजीमुळे माझ्या बाळाचा हात कापावा लागला, असा आरोप त्यांनी केला होता. याप्रकरणी पालघरचे जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. संजय बोदाडे यांनी चौकशी करून अहवाल सादर केला आणि रुग्णालयाला क्लिन चिट दिली होती. त्यावर अंजली वाला यांनी नाराजी व्यक्त केली आहे. त्रिवेणी रुग्णालयाबरोबर संगनमत करून हा अहवाल बनवण्यात आल्याचा आरोप पालकांनी केला आहे.

CamScanner

②

लोकसत्ता पु. ५१.१

# अशुध्द पाण्याची विक्री?

## वसई, विरार शहरात ५०० हून अधिक बेकायदा बाटलीबंद पाण्याचे उद्योग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार:** शहरात बाटलीबंद पाण्याच्या प्रकल्पाची झपाट्याने वाढ होत आहे. यातील बहुतांश प्रकल्प हे शासनाच्या कोणत्याही परवानग्या न घेता बेकायदा सुरू आहेत. या प्रकल्पात मिनरल वॉटरच्या नावाने पाण्यावर रासायनिक प्रक्रिया करून नागरिकांना अशुद्ध पाणी विकले जाते. पण अन्न व औषध प्रशासन आणि स्थानिक महापालिका केवळ कारवाईसाठी एकमेकांवर जबाबदारी ढकलत आहेत.

वसई, विरार परिसरात २५ लाखांच्या आसपास लोकसंख्या आहे. शासनाच्या नियमानुसार प्रतिदिन प्रतिमाणसी १३५ लिटर पाण्याचा पुरवठा करणे आवश्यक असताना पालिकेकडून केवळ प्रतिमाणसी केवळ ९० लिटर पाण्याची पूर्तता केली जाते. यामुळे प्रतिदिन माणसाला ४५ लिटर पाणी दिले जात आहे. त्यातही पालिकेकडून महापालिकेच्या क्षेत्रात नसलेल्या गावांना पाणी दिले जात नाही. वसईत औद्योगिक वसाहतीत हजारो कामगार आजही केवळ या बाटलीबंद पाण्यावर आपली तहान भागवत आहेत. यामुळे वसई-विरारमध्ये पाण्याची मोठी बाजारपेठ तयार झाली आहे. प्रत्येक व्यवसायाच्या ठिकाणी पाण्याची चाचणी करणारी प्रयोगशाळा आवश्यक आहे. असे असतनाही सर्व नियम पायदळी तुडवत गल्लीबोळात पाणी माफिया आपली दुकाने थाटत आहेत. बाटलीबंद मिनरल वॉटर म्हणून अस्वच्छ, अशुद्ध पाणी विकत आहेत.

या प्रकल्पांवर अन्न व औषध प्रशासनाकडून कारवाई करणे अपेक्षित आहे. पण त्यातही पाणी माफियांनी शक्कल लढवत ते पाण्याच्या बाटल्यांना सील करत नसल्याने अन्न व औषध प्रशासनाला त्यांच्यावर नियमानुसार कारवाई करता येत नाही. दुसरीकडे महापालिका अन्न व औषध प्रशासनाची जबाबदारी सांगत काढता पाय घेत आहे. यामुळे हे पाणी माफिया बिनदिक्कत नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहेत.

केवळ अधिकाधिक नफा मिळवण्यासाठी, सारेच नियम धाब्यावर बसवून पाणी माफिया पाण्याचा बेकायदा धंदा करत आहेत. वसई-विरार परिसरातील अनेक चाळी, औद्योगिक वसाहतीत, छोटे गाळे यांच्यात शुद्ध पाण्याच्या नावाखाली पॅकेजिंग मिनरल वॉटरचे बेकादा धंदे सुरू झाले आहेत. बोरिंगचे पाणी, टँकरचे पाणी, विहिरीचे पाणी, सेन्टॅक्सच्या टाकीत टाकून त्यात रसायने टाकून पाणी शुद्ध केले जाते आणि हेच पाणी बाटल्यात भरून आरोचे पाणी म्हणून पॅकेजिंग वॉटरच्या नावाखाली विकत आहेत.

वसई-विरारमध्ये ५०० हून अधिक प्रकल्प आहेत यात २० लिटरचे मोठे बाटले बनविणारे सर्वाधिक आहेत. तर एक लिटर आणि अर्धा लिटरच्या पाण्याच्या बाटल्या बनविणारे हाताच्या बोटावर आहेत. यामुळे ९० टक्के



### नियम काय?

पॅकेजिंग वॉटरचा व्यवसाय करणाऱ्या कंपन्यांना दर्शनीय भागावर फलक लावणे गरजेचे आहे. त्यावर आय.एस.आय.चे मार्क, ब्युरो ऑफ इंडियन स्टँडर्डचा (बिआयएस) कोड तसेच अन्न व औषध प्रशासनाचा परवाना आणि प्रयोगशाळा असणे आवश्यक आहे. तसे न केल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करण्याचे सांगितले आहे.

**“याबाबत हरित लवादाने निर्णय दिला आहे की, जे पाण्याचे प्रकल्प सीलबंद पाणी विकत नाहीत त्यांवर स्थानिक प्रशासन आणि महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांना कारवाई करणे गरजेचे आहे. सीलबंद प्रकल्पावरच अन्न व औषध प्रशासनाला कारवाई करता येते.**

**-सुरेश देशमुख**, सहआयुक्त, अन्न, कोकण विभाग ठाणे

लोकसत्ता पु. ५१-१

# ‘वॉकिंग प्लाझा’मध्ये वाहनांची घुसखोरी

**लोकसत्ता वार्ताहर**

**भाईंदर:** मीरा- भाईंदर महापालिकेने नागरिकांसाठी तयार केलेल्या ‘वॉकिंग प्लाझा’ परिसरात वाहनांची घुसखोरी सुरू झाली आहे. यामुळे मोकळ्या जागेत फिरण्यासाठी येणाऱ्या नागरिकांची गैरसोय होऊ लागली आहे.

भाईंदर पश्चिम येथील राधा स्वामी सत्संग परिसर हा खारफुटी क्षेत्राजवळ असल्याने या ठिकाणी मोकळी आणि स्वच्छ हवा असते. नागरिकांना या परिसरात मोकळेपणे चालता यावे यासाठी महापालिका व काशिमीरा वाहतूक विभागाने येथील २ किलोमीटरचा रस्ता ‘वॉकिंग प्लाझा’ म्हणून तयार केला होता. या रस्त्यावर स्थानिक नागरिकवगळता इतरांना सकाळी ६ ते ८ ह्या वेळेत वाहने घेऊन येण्यास मनाई करण्यात आली होती. वाहनांना रोखण्यासाठी पोलीस कर्मचारी देखील तैनात केले जात होते. मात्र गेल्या काही दिवसांपासून पोलीस कर्मचारी दिसून येत नसल्यामुळे दुचाकी आणि चारचाकी वाहनांचा वावर येथे वाढू लागला आहे. सध्या पोलीस भरती प्रक्रिया सुरू असल्याने मनुष्य बळ हे तेथील महत्त्वाच्या कामात व्यस्त असल्याची माहिती पोलीस विभागाकडून देण्यात आली आहे.

CS CamScanner

लोकसत्ता ५.५१-१

# पतंगांच्या मांज्यांमुळे पक्ष्यांवर संक्रांत

## वसई-विरारमध्ये १८ पक्षी जखमी तर सहा मृत्यू

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई :** वसई, विरार शहरात पतंग उडविताना मांजाचा फटका हवेत मुक्तपणे विहार करणाऱ्या पक्ष्यांना बसला आहे. मागील दोन दिवसांत शहरात १८ पक्षी जखमी झाले आहेत तर ६ पक्ष्यांचा मृत्यू झाला आहे.

वसई, विरार शहरात मकर संक्रांतीच्या निमित्ताने विविध ठिकाणी पतंग उडविण्याचा आनंद लुटला जात होता. मात्र याच दरम्यान आकाशात मुक्तपणे विहार करणाऱ्या पक्ष्यांना पतंगाचा मांज्या लागून जखमी होतात. विशेषतः पंखाना मांजा अधिक पक्षी जखमी होत असतात तर काही वेळा त्यांचा मृत्यूही होत असतो.

अशा पक्ष्यांना उपचार मिळून त्यांना जीवदान मिळावे यासाठी विरार येथील करुणा ट्रस्ट या प्राणिप्रेमी सेवी संस्थेकडून १४ व १५ जानेवारी या दरम्यान शिबीर ठेवण्यात आले होते. या शिबिरात २४ पक्षी उपचारासाठी आणले होते. यात कबुतर, पोपट या पक्ष्यांचा समावेश आहे. यातील ६ कबुतरांचा त्रा मृत्यू झाला आहे. जसे जसे पक्षी बरे होत आहेत त्यांना पुन्हा मुक्तपणे आकाशात सोडण्यात येत असल्याची माहिती प्राणिमित्र मितेश जैन यांनी सांगितले आहे.



> यावर्षी मागील वर्षीपेक्षा अधिक पक्षी जखमी झाले आहेत. या जखमी पक्ष्यांवर प्राणिमित्र व पशुवैद्यांनी उपचार केले.
>
> -मितेश जैन, मानद जिल्हा पशु कल्याण अधिकारी, प्राणिमित्र, वसई.

### मीरा-भाईंदरमध्ये ५७ पक्षी जखमी

मीरा-भाईंदर शहरात मांजामुळे ५७ पक्षी जखमी झाले. यातील दोन पक्ष्यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला आहे. कबुतर आणि कावळा हे पक्षी जखमी झाले. यात पन्नासहून अधिक कबुतरांचा समावेश आहे. सहयोग फाऊंडेशन, अहिंसा चॅरिटेबल ट्रस्ट आणि अलर्ट ग्रुपकडून उभारण्यात आलेल्या उपचार केंद्राने माहिती दिली आहे. पक्ष्यांवर उपचार करून सोडून दिले जात असल्याची अहिंसाचे अध्यक्ष कुशल शाह यांनी दिली.

### साडेचौदा हजार किमतीचा नायलॉन मांजा जप्त

बंदी असलेल्या मांजाची विक्री करणाऱ्या दुकानांवर तुळस पोलिसांच्या गुन्हे प्रकटीकरण शाखेने कारवाई केली आहे. या कारवाईमध्ये १४ हजार ५०० रुपये किमतीचा मांजा जप्त करून ३ गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. सदरची कारवाई तुळींज पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक शैलेंद्र नगरकर, सहायक पोलीस निरीक्षक (गुन्हे) मिथुन म्हात्रे, पोलीस उपनिरीक्षक बाळासाहेब बांदल व त्यांच्या पथकाने केली आहे.

लोकसत्ता ५.५१-१

# भूमिअभिलेख विभागात मोजणीचे ३०६ अर्ज प्रलंबित

**लोकसत्ता वार्ताहर**

**वसई:** वसई, विरार विविध प्रकल्पाच्या मोजण्या व गावठाण सर्वेक्षण अशी कामे सुरू असल्याने वसई, विरारमध्ये मोजणीची कामे दीड महिन्यापासून बंद होती. त्यामुळे मोजणीचे सुमारे ३०६ अर्ज प्रलंबित राहिले आहेत.

सध्या वसई, विरार शहरातील जमिनींचा व्यवहार अधिकच वाढला आहे. त्यामुळे जागा निश्चित करणे, जागेचा आराखडा तयार करणे अशा विविध प्रकारच्या कामासाठी भूमिअभिलेख विभागाकडे दिवसेंदिवस येणाऱ्या अर्जांची संख्या वाढली आहे. भूमिअभिलेख विभागाने १५ नोव्हेंबर २०२२ पासून जानेवारीच्या पहिल्या आठवड्यापर्यंत इतर जागा मोजणीची कामे बंद ठेवली होती. या कालावधीदरम्यान जागा मोजणीसाठी नागरिकांनी अर्ज सादर केले होते. मात्र मोजणी बंद असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत होता. सुमारे ३०६ जणांचे अर्ज मोजणीसाठी आले असल्याची माहिती भूमिअभिलेख विभाग वसई यांच्या मार्फत देण्यात आली आहे.

> भूमिलेख विभागाकडून मोजणीचे काम सुरू केले आहे. प्रलंबित असलेल्या मोजण्या फेब्रुवारी अखेरपर्यंत पूर्ण केल्या जातील. नागरिकांनी थोडे सहकार्य करावे. - रणजीत देशमुख,
>
> उपअधीक्षक अभियंता, वसई भूमिअभिलेख

आता या मोजणीची कामे पुन्हा एकदा सुरू करण्यात येणार आहेत. ९ तारखेपासून कामाचे वाटप केले आहे. आतापर्यंत ३०६ पैकी ११८ अर्ज जागा मोजणीच्या कामासाठी वाटप करून देण्यात आले असल्याचे वसई भूमिअभिलेख विभागाचे उपअधीक्षक अभियंता रणजीत देशमुख यांनी सांगितले आहे.

लोकसत्ता ५.५१-१

# गतिरोधकांवर 'सोलार रिफ्लेक्टर'

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**विरार :** वसई, विरार शहरातील गतिरोधकांवर सोलार रिफ्लेक्टर लावण्याचा निर्णय महापालिकेने घेतला आहे.

वसई, विरारमध्ये रस्त्यावर असलेल्या गतिरोधकांच्या बाबतीत महानगरपालिका सदैव उदासीन राहिली आहे. रस्ते बनविताना वाटेल तिथे गतिरोधक टाकण्यात आले आहेत. ठेकेदार मनमानी कारभाराने रस्त्यावर गतिरोधक टाकून त्याची उंची, रुंदी आणि चढउतार याचे कोणतेही निकष पाळत नसल्याने रस्त्यावरील गतिरोधक सुविधांपेक्षा अडथळा निर्माण करत आहेत. वाहने सरळ या गतिरोधकाला आदळत असल्यामुळे चालकाचे हाल होत आहेत. अनेक दुचाकी चालकांना अपघाताला सामोरे जावे लागत आहे. रस्त्यावरील नियमबाह्य गतिरोधकांना दर्शक पट्टे नसल्याने अनेक वेळा हे गतिरोधक दिसून न आल्याने वाहनांचे अपघात होत आहेत. त्यामुळे पालिका आयुक्त अनिलकुमार पवार यांनी या गतिरोधकांवर सोलार रिफ्लेक्टर लावण्याचा निर्णय घेतला आहे. रिफ्लेक्टर सौर ऊर्जेवर चालणार असल्याने त्याच्यासाठी अतिरिक्त विद्युतपुरवठा करावा लागणार नाही. यामुळे पालिकेचा पैसा वाचला जाणार आहे.

लोकसत्ता ५.५१-४

# गटारांवरील झाकणे चोरणारी टोळी अटकेत

**लोकसत्ता विशेष प्रतिनिधी**

**वसई :** गटारांवरील झाकणे चोरणाऱ्या एका टोळीला वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेने अटक केली आहे. पोलिसांनी या टोळीकडून वसई आणि मुंबईतील घरफोडी आणि चोरीच्या आठ गुन्ह्यांची उकल केली आहे.

वसई-विरार शहरांत पालिकेने गटारांवर लावलेली लोखंडी झाकणे चोरण्याचे प्रकार वाढले होते. काही दिवसांपूर्वी वसईच्या तुंगारेश्वर परिसरात गटारावरील ७० हजार रुपये किमतीची सात लोखंडी झाकणे चोरण्यात आली होती. या प्रकरणाचा वालीव गुन्हे प्रकटीकरण शाखेने तपास करून विकी नरेंद्र सिंग, हेंमत मोकाशी, अजित ठाकूर, विघ्नेश पारधी, आणि मोतीम खान यांना अटक केली. आरोपींकडून अडीच लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. ही सराईत टोळी असून त्यांच्याविरोधात वसई आणि मुंबईतील पोलीस ठाण्यात घरफोडी आणि जबरी चोरीचे आठ गुन्हे दाखल आहेत. गुन्हे प्रकटीकरण शाखेचे साहाय्यक पोलीस निरीक्षक ज्ञानेश फडतरे यांच्या पथकाने ही कारवाई केली.

लोकसत्ता ५.५१-४

# वेश्याव्यवसायावर कारवाई

**वसई :** नालासोपाऱ्याच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक शाखेने नालासोपारा येथील एका वेश्याव्यवसायावर कारवाई करून बांगलादेशी पीडित महिलेची सुटका केली आहे. याप्रकरणी एका दलालास अटक करून सात जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

नालासोपारा पूर्वेच्या तलाठी कार्यालासमोरील सुरज इमारतीत रूबेल मंडल हा वेश्याव्यवसाय चालवत असल्याची माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाच्या नालासोपारा शाखेला मिळाली होती. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकून एका बांगलादेशी पीडित महिलेची सुटका केली. या महिलेला तीन वर्षांपूर्वी बांगलादेशातून घरकामाचे आमिष दाखवून भारतात आणले होते. मात्र, तिला वेश्याव्यवसाय करण्यास भाग पाडले जात होते. तिने नकार दिल्यानंतर मारहाण करून छळ केला जात होता.



CS CamScanner

म.टा. पु. ५१-१

# सरकारी जमिनीवरील अतिक्रमणांवर बडगा

**म. टा. वृत्तसेवा, वसई**

वसई तालुक्यातील बहुतांश सरकारी जमिनीवर अतिक्रमणे झाली असून रहिवासी, तसेच औद्योगिक वापरासाठी हे बांधकाम केले जात आहे. ही बांधकामे आता डोकेदुखी ठरत असल्याने वसईचे तहसीलदार तसेच कार्यकारी दंडाधिकारी यांनी अनधिकृत बांधकामांवर तात्काळ कारवाईचे आदेश सोमवारी तलाठी आणि मंडल अधिकाऱ्यांना दिले आहेत. त्यामुळे अनधिकृत बांधकामधारकांचे धाबे दणाणले आहेत.



**अनधिकृत बांधकामे हटवण्याचे तहसीलदारांचे आदेश**

पालघर जिल्ह्यातील सरकारी जमिनीवरील अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याबाबत पालघर जिल्हाधिकाऱ्यांनी एप्रिल २०१८मध्ये आदेश दिले होते. महापालिका, पोलिस प्रशासन आणि इतर संबंधित यंत्रणांची मदत घेत संयुक्त कारवाईचे आदेश त्यांनी दिले होते. त्यावेळी पाडकामाची मोहीम हाती घेण्यात आली होती. या दरम्यान, सरकारी जमिनीवरील आणि वनजमिनीवरील एकूण १३ हजार ४०६ अतिक्रमणे आणि अनधिकृत बांधकामांचे सर्वेक्षण करण्यात आले होते. या सर्वांना नोटिसादेखील पाठवण्यात आल्या होत्या, तर ११ हजार ३८६ प्रकरणांत सुनावणी घेण्यात आली होती. त्यानंतर या अनधिकृत बांधकामांवर कारवाईचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी दिले होते. दरम्यान, वसई तालुक्यातील शिरगाव येथील सरकारी गुरचरण जमिनीवरील अनधिकृत बांधकामांची परस्पर विक्री केल्याची घटना नुकतीच समोर आली होती. या प्रकरणी येथील मंडळ अधिकाऱ्यांनी आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करत कारवाई केली आहे.

या पार्श्वभूमीवर, या अनधिकृत बांधकामांसह तालुक्यातील इतर ठिकाणीही सरकारी जमिनींवर झालेल्या अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्याची मागणी करण्यात येत होती. या अनधिकृत बांधकामांची स्थिती अधिकच बिकट होऊ नये, यासाठी त्याआधीच त्यावर कारवाई करावी, महापालिकेकडे असलेली यंत्रणा, पोलिस बंदोबस्त यांचे सहकार्य घ्यावे, असे आदेश वसईच्या तहसीलदार उज्ज्वला भगत यांनी तालुक्यातील सर्व मंडळ अधिकारी आणि तलाठी यांना दिले आहेत.

### परस्पर विक्री केल्यास गुन्हे

सरकारी जमिनीवर बांधकामे केलेल्यांनी त्याची परस्पर विक्री केल्यास अशांविरोधात गुन्हे दाखल करावेत, असे आदेशही वसईच्या तहसीलदार भगत यांनी दिले आहेत. सरकारी जमिनींवर सरकारच्या मालकीबाबतचे कायमस्वरूपी फलक दर्शनी भागात लावावेत, तसेच अनधिकृत बांधकामे होणार नाहीत, याची काळजी घ्यावी, असेदेखील तहसीलदारांनी आपल्या आदेशात नमूद केले आहे.

सकाळ पु. ५१-१

# कचरा निविदा वादाच्या भोवऱ्यात

## मिरा-भाईंदर महापालिकेविरोधात कंत्राटदार उच्च न्यायालयात

भाईंदर, ता. १६ (बातमीदार) : शहरातील दैनंदिन कचरा गोळा करण्यासाठी महापालिकेकडून ७५० कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे. ही निविदा प्रक्रिया आता वादाच्या भोवऱ्यात सापडली आहे. एका विशिष्ट कंपनीसाठी अटी-शर्तींमध्ये फेरबदल करण्यात आला असल्याचा आरोप करून निविदेत सहभागी झालेल्या एका कंत्राटदाराने उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.

मिरा-भाईंदर शहरात दररोज सुमारे ४५० टन कचरा गोळा केला जातो. कचरा गोळा करण्यासाठी महापालिकेने नेमलेल्या कंत्राटदारांची मुदत पाच वर्षांपूर्वीच म्हणजेच २०१७ मध्ये संपुष्टात आली आहे. मात्र त्याच कंत्राटदाराला वेळोवेळी मुदतवाढ देण्यात आली आहे. वास्तविक कोणत्याही कंत्राटाची मुदत संपुष्टात आल्यानंतर नवीन निविदा प्रक्रिया झाली नसेल तर आधीच्या कंत्राटदाराला नियमानुसार जास्तीत जास्त सहा महिन्यांची मुदतवाढ दिली जाते. असे असतानाही जुन्या कंत्राटदाराला तब्बल पाच वर्षे मुदतवाढ देण्यात आली असल्यामुळे आश्चर्य व्यक्त होत आहे.

आता पाच वर्षांनंतर नव्याने कंत्राटदार नेमण्याची प्रक्रिया प्रशासनाने सुरू केली आहे. आगामी पाच वर्षे कचरा संकलन करण्यासाठी तब्बल ७५० कोटी रुपयांची निविदा काढण्यात आली आहे. या निविदेत चार कंत्राटदार सहभागी झाले आहेत. त्यात सध्या काम करत असलेली ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट या कंपनीसह कोणार्क, आर अँड बी आणि अँथोनी यांचा समावेश आहे. निविदेसाठी तांत्रिक व आर्थिक अशा दोन्ही बोली उघडण्यात आल्या आहेत. केवळ पात्र कंत्राटदारांची निवड करून त्यांना कार्यादेश देणे बाकी आहे. मात्र तत्पूर्वीच निविदा प्रक्रियेत सहभागी झालेल्या आर अँड बी कंपनीने निविदा प्रक्रियेवर आक्षेप घेत उच्च न्यायालयात धाव घेतली आहे. दुसरीकडे न्यायालयाने निविदा प्रक्रियेला स्थगिती दिली नसली तरी न्यायालय जो निर्णय देईल तो निर्णय या निविदा प्रक्रियेला बंधनकारक असल्याचे न्यायालयाने म्हटले आहे. या प्रकरणी पुढील सुनावणी १८ जानेवारीला होणार आहे.




सर्व कंपन्या पात्र असल्यामुळेच त्यांना प्रक्रियेत सहभागी करून घेतले आहे. संपूर्ण निविदा प्रक्रिया पारदर्शक असून त्यात काही नियमबाह्य नाही. ग्लोबल कंपनी स्वत: काळ्या यादीत समाविष्ट नाही. या कंपनीला निविदेत सहभागी करून घेतले जाईल, असे शपथपत्र महापालिकेने दोन वर्षांपूर्वी न्यायालयात दाखल केले आहे. न्यायालय यावर जो निर्णय देईल त्यानुसार कार्यवाही केली जाईल.

- **रवी पवार**, उपायुक्त, महापालिका

### » काय आहेत आक्षेप?

१ कंत्राटदाराची नेमणूक करण्यासाठी २०२० मध्येही निविदा काढण्यात आली होती. त्यावेळी कंत्राटदार कंपनीचा कुठेही काळ्या यादीत समावेश नसावा, अशी अट होती. काही कारणास्तव त्यावेळी ही निविदा प्रक्रिया रद्द झाली. मात्र यावेळच्या निविदा प्रक्रियेत काळ्या यादीची अट सोयीस्कररित्या वगळण्यात आली. निविदेत सहभागी झालेली ग्लोबल वेस्ट मॅनेजमेंट कंपनी अन्य महापालिकेत काळ्या यादीत समाविष्ट असल्याचे संबंधित महापालिकेच्या विधी विभागाचे मत आहे.

२ पण या कंपनीला निविदा मिळावी यासाठीच ही अट वगळण्यात आली असल्याचा मुद्दा आर अँड बी ने याचिकेत नमूद केला आहे. याव्यतिरिक्त कोणार्क कंपनीलादेखील निविदेत समाविष्ट करण्यासाठी ती कंपनी अनेक मुद्द्यांवर पात्र नसतानाही त्यांना निविदा प्रक्रियेत समाविष्ट करून घेण्यात आले आहे. दोन्ही कंपन्या पात्र नसल्याचे पत्र प्रशासनाला देण्यात आल्यानंतरही त्यांना निविदेत सहभागी करून घेण्यात आले असल्याचे आर अँड बी कंपनीने उच्च न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेत म्हटले आहे.

CamScanner

सकाळ पु. पा-७

### वसईत पोलिसाने वाचवला जीव

# मांज्यात अडकलेल्या कबूतराला जीवदान

नालासोपारा, ता. १६ (बातमीदार) : नायलॉन मांज्यात अडकलेल्या कबुतराचा पक्षीप्रेमी पोलिसाने जीव वाचविला आहे. किरण आव्हाड असे या पोलिस पक्षीप्रेमीचे नाव आहे. वसई पूर्वेतील एव्हरशाईन परिसरातील ही घटना आहे. रविवारी मोठ्या उत्साहात मकर संक्रांतीनिमित्त पतंग उडविण्यात आले आहेत. पतंग उडवताना तुटलेल्या नायलॉन मांज्यात कबुतर अडकून पडले होता. ही घटना पक्षीप्रेमी किरण यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी कबुतरला पकडून कात्रीने मांज्या तोडून त्याला जीवदान दिले आहे.

वसई, विरार, नालासोपाऱ्यात मोठ्या उत्साहात मकर संक्रांतीचा सण साजरा झाला आहे. यानिमित्त लहानग्यांपासून वयोवृद्ध नागरिकांनी पतंग उडविण्याचा आनंद घेतला. अशात एव्हरशाईन परिसरात पतंगाच्या तुटलेल्या मांज्यात एक कबुतर अडकले होते. त्याच्या संपूर्ण शरीराभोवती मांजा गुडळला गेला होता, यामुळे त्याला दुखापत झाली होती. ही बाब किरण आव्हाड या पक्षीप्रेमी पोलिसाच्या निदर्शनास आली. त्यानंतर त्यांनी त्वरित कबुतरला पकडून कात्रीने मांजा तोडून त्याला जीवदान दिले. आपली संस्कृती आणि सणवार आनंदाने साजरा करावा, पण आपला आनंद पक्ष्यांच्या, प्राण्यांच्या जीवावर बेतणार नाही याची काळजी घ्यावी, असे आवाहन त्यांनी केले.



**नालासोपाऱ्यात नायलॉन मांजा जप्त**

तुळिंजचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक नगरकर यांनी नालासोपारा परिसरात हजारो रुपयांच्या नायलॉन मांजाचे बंडल जप्त करत विक्रेत्यांवर कारवाई केली.

सकाळ पान-५

# फिंगरप्रिंटने कोट्यवधीचा अपहार

## परस्पर पैसे काढल्याप्रकरणी ३६ रिटेलर्सविरोधात गुन्हा

नवी मुंबई, ता. १५ (वार्ताहर) : राज्यभरातील हजारो ऑनलाईन पेमेंट रिटेलर्सपैकी ३६ जणांनी हजारो ग्राहकांच्या बँक खात्यातून परस्पर तब्बल एक कोटी १८ लाख रुपये काढून त्याचा अपहार केल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. यासाठी आधारकार्ड व फिंगरप्रिंट, तसेच संगणकीय साधनांचा वापर करण्यात आला. वाशी पोलिसांनी ३६ रिटेलर्सविरोधात फसवणूक, अपहार, तसेच आयटी कायद्यानुसार गुन्हा दाखल केला आहे.

ग्राहकांना बँकिंग क्षेत्रामध्ये व्यवहार करणे सुकर व्हावे, यासाठी वाशीतील व्ही. के. वेंचर प्रा. लि. या कंपनीने बँकिंग व ई-कॉमर्स (फिनटेक) यांना एकत्रित केले आहे. तसेच विविध बँकिंग प्रणालीसोबत भागीदारी केली आहे.



### ग्राहकांना रक्कम परत

रिटेलर्सने ग्राहकांच्या संमतीशिवाय त्यांच्या खात्यातून रक्कम काढल्याने व्ही. के. वेंचर्स कंपनीला सदरची रक्कम ग्राहकांना परत द्यावी लागली. त्यामुळे कंपनीने तपासणी केली असता ३६ रिटेलर्सनी ग्राहकांच्या खात्यातून संमतीशिवाय रक्कम काढून त्याचा अपहार केल्याचे आढळून आले. त्यामुळे कंपनीने ३६ रिटेलर्सविरोधात तक्रार दाखल केली.

कंपनीमार्फत नोंदणीकृत असलेल्या राज्यभरातील हजारो रिटेलर्सना मनी ट्रान्स्फर, आधारकार्डच्या माध्यमातून पैसे काढणे, मोबाईल रिचार्ज करणे, मायक्रो एटीएम, बिल पेमेंट व इतर सेवा दिल्या जातात. त्यानंतर सदर रिटेलर हे स्थानिक क्षेत्रामध्ये ग्राहकांना सुविधा देतात. ही सर्व यंत्रणा नॅशनल पेमेंट कॉर्पोरेशन ऑफ इंडियाच्या निकषानुसार कार्यरत असते. या कंपनीकडे नोंदणीकृत असलेल्या ३६ रिटेलर्सनी ऑगस्ट २०२२ ते १४ जानेवारी २०२३ या कालावधीत ग्राहकांचे आधारकार्ड व फिंगरप्रिंट, तसेच संगणकीय साधनांचा वापर करून ग्राहकांच्या बँक खात्यातून एक कोटी १८ लाख रुपये काढण्यात आले. त्यामुळे ग्राहकांनी संबंधित बँकेकडे तक्रारी केल्यानंतर त्यांनी कंपनीच्या नोंदणीकृत असलेल्या येस बँकेकडे तक्रार दिली होती. या प्रकरणीचा तपास केला असता रिटेलर्सने अपहार केल्याचे उघडकीस आले.

CamScanner

# भाईंदरमध्ये गॅस शवदाहिनीतून सिलिंडरची चोरी

भाईंदर, ता. १६ (बातमीदार) : भाईंदर पश्चिम येथील स्मनाशभूमीत असलेल्या गॅस शवदाहिनीतून चक्क गॅस सिलिंडरची चोरी झाली आहे. विशेष म्हणजे हे सिलिंडर स्मशानातील कर्मचाऱ्यांकडून परस्पर बाहेर नेण्यात येत असल्याचे उघड झाले. याबाबत भाईंदर पोलिस ठाण्यात नोंद करण्यात आली आहे.

स्मशानभूमीत असलेल्या गॅस शवदाहिनीसाठी गॅस सिलिंडर पुरवठा करण्यासाठी महापालिकेने नवकार गॅस एजन्सीला कंत्राट दिले आहे. तसेच या यंत्रणेची देखभालीसाठी कंत्राटदाराची नियुक्ती केली आहे. या कंत्राटदाराने यंत्रणा सुस्थितीत सुरू ठेवण्यासाठी, तसेच स्मशानभूमीत येणाऱ्या मृतदेहांवर अंत्यसंस्कार करण्यासाठी कर्मचारी ठेवले आहेत. पण गेल्या काही काळापासून पालिकेला येणाऱ्या गॅस पुरवठ्याच्या देयकामध्ये भरमसाठ वाढ झाली असल्याचे दिसून येत होते. एवढी वाढ अचानक का झाली, याची माहिती घेण्यासाठी पालिकेच्या सार्वजनिक बांधकाम विभागाने स्मशानभूमीतील कर्मचाऱ्यांवर पाळत ठेवली. त्यावेळी स्मशानातील बबन खुळे, राहुल खुळे व आणखी एक व्यक्ती स्मशानभूमीतील दोन गॅस सिलिंडर परस्पर रिक्षातून घेऊन जात असल्याचे आढळून आले. ही बाब गांभीर्याने घेत संबंधित कर्मचाऱ्यांवर गुन्हा दाखल करून पुढील योग्य ती कारवाई करावी, असे पत्र शहर अभियंता दीपक खांबित यांनी भाईंदर पोलिस ठाण्याला दिले आहे.

## चौकशीनंतर कारवाई

यासंदर्भात महापालिकेकडून आणखी तपशील मागविण्यात आले आहेत. त्यानंतर त्याची संपूर्ण चौकशी करून योग्य ती कारवाई करण्यात येईल, अशी माहिती वरिष्ठ पोलिस निरीक्षक एम. बी. पाटील यांनी दिली.

# नेपाळी गँगच्या दरोडेखोरांना अटक

मनोर, ता. १६ (बातमीदार) : बोईसर परिसरात चोऱ्या आणि घरफोडी करून धुमाकूळ घातलेल्या नेपाळी गँगच्या तीन दरोडेखोरांच्या टोळीला बोईसर पोलिसांनी ठाणे जिल्ह्यातील मुंब्रा येथून शुक्रवारी (ता. १३) अटक केली. आरोपींना न्यायालयात हजर केले असता सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली. दरोडेखोर टोळीतील मुख्य आरोपी फरार असल्याने त्याचा शोध सुरू असल्याचे पोलिसांकडून सांगण्यात आले.

सरावली, त्रिवेदीनगर येथील वातानुकूलित मशीन (एसी) दुरुस्तीचे दुकान १० जानेवारी रोजी रात्रीच्या वेळी चोरांनी फोडून त्यातील सामानाची चोरी केली होती. या गुन्ह्याचा तपास करताना सीसीटीव्ही चित्रीकरणाच्या साह्याने चोरांना पकडण्यात बोईसर पोलिसांना यश आले.

सरावली भागात दहा दिवसांपूर्वीच राहावयास आलेले नेपाळमधील दोन तरुण गायब असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. तिच्या आधारे पोलिसांनी त्यांचे मोबाईल नंबर मिळवत त्यांचा ठावठिकाणा शोधला. त्यानंतर बोईसर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक प्रदीप कसबे यांच्या नेतृत्वाखाली पथकाने मुंब्रा (जि. ठाणे) येथील इमारतीमध्ये नातेवाईकांच्या घरी लपून बसलेल्या गणेश ऊर्फ दिनेश विनोद शाही (३३)आणि कमल झंकर खत्री (२८) यांना ताब्यात घेतले. त्यानंतर उमरोळीमध्ये राहणारा त्यांचा साथीदार प्रेम रतन बिश्त (४३) याला अटक करण्यात आली. चोरी आणि दरोड्यांमधील त्यांचा म्होरक्या रमेश बिश्त (रा. मालाड) फरार झाला आहे. अटक आरोपींविरोधात गुन्हा दाखल करून न्यायालयात हजर केले असता त्यांना सोमवारपर्यंत पोलिस कोठडी सुनावण्यात आली.

CamScanner

लोकमत

न्यूज Inbox

# नालासोपाऱ्यात दुचाकीची चोरी

नालासोपारा : नालासोपारा येथे दुचाकीची चोरी झाल्याची घटना समोर आली आहे. संतोष भुवन येथील आझादनगर चाळीत राहणाऱ्या सलीम सिद्दिकी (२४) यांची सुझुकी एक्सेस स्कूटी शनिवारी रात्री संतोष भुवन पेट्रोल पंपाजवळील फिटनेस जीम समोर पार्क करून ठेवली असताना चोरट्यांनी चोरून नेली आहे. रविवारी तुळींज पोलिसांनी वाहन चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.

Hello Vasai
Page No. 3 Jan 17, 2023
Powered by: erelego.com

CS CamScanner

DIGITAL
मुंबई, मंगलवार, 17 जनवरी 2023
प्रवासी संदेश
PRAVASI SANDESH
www.pravasisandesh.news
9004746488 pravasisandesh1@gmail.com www.facebook/ pravasisandesh1/

# कोयते से काटा केक, पुलिस ने पहुचाया जेल




■ प्रवासी संदेश / जितेंद्र तिवारी

**भिवंडी।** पिंपल घर गांव में रहने वाले एक व्यक्ति को कोयते से केक कटाना भारी पड़ा।पुलिस ने इसे समाज मे दहसत फैलाने वाला कदम मानते हुए आर्म एक्ट के तहत केस दर्ज कर उसे गिरफ्तार कर जेल में डाल दिया है।उक्त घटना शहर में चर्चा का विषय बना हुआ है। नवेश सुदाम पाटील उर्फ नवा भाई को कोयता से केक काटकर अपना 31वां जन्मदिन मनाना उस वक्त महंगा पड़ गया,जब भिवंडी पुलिस ने उसे गिरफ्तार कर जेल में डाल दिया।

पुलिस सूत्रों के अनुसार भिवंडी के कोनगांव पुलिस स्टेशन अंतर्गत आने वाले पिंपलगांव स्थित हनुमान मंदिर के सामने रहने वाले नावेस सुदाम पाटिल(31) ने अपनी हनक बनाने के लिए अपने गांव के सार्वजनिक स्थान पर कोयता से केक काटकर अपना जन्मदिन मनाया था। जिससे गांव परिसर में भय का वातावरण फैल गया था। इस आशय की जानकारी प्राप्त होते ही कोनगांव पुलिस ने मामले की गंभीरता को संज्ञान लेते हुए भिवंडी जोन-2 के पुलिस उपायुक्त नवनाथ ढ़वले के मार्गदर्शन और कोनगांव पुलिस स्टेशन के वरिष्ठ पुलिसनिरीक्षक राजेंद्र पवार की अगुवाई में नावेस पाटिल उर्फ नवा भाई के कोयते से केक काटने वाले कदम को समाज मे दहशत फैलाने वाला कदम मानते हुए आर्म एक्ट 25, 4 सहित महाराष्ट्र पुलिस अधिनियम की धारा 37 (1) और 135 के तहत केस दर्जकर कर लिया है।साथ ही उसके पास से केक कटाई में प्रयुक्त दो फुट लंबा धारदार कोयता बरामद किया है।

CS CamScanner

लोकमत

# उद्योजिका, गृहिणींना हवी बंदूक!

## वसईत ३५२ जणांकडे शस्त्र परवाने : आयुक्तालयातून परवाने देणे झाले सुरू

मंगेश कराळे

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** वसईत आतापर्यंत ३५१ परवाने जिल्हाधिकारी यांच्या काळात देण्यात आले होते. नवनिर्मित झालेल्या मिरा भाईंदर वसई विरार पोलीस आयुक्तालयातून आतापर्यंत १ नवीन परवाना देण्यात आला आहे. नवीन शस्त्र परवाने देण्याची प्रणाली पोलिस आयुक्तालयातील परवाना कक्षातून देण्याचे सुरू झाले. महिलांवरील वाढते अत्याचार पाहता, सुरक्षेच्या दृष्टिकोनातून सर्वच स्तरातील महिलांनाही बंदुकीची गरज असल्याचे महिला वर्गात बोलले जात आहे.

स्वतःच्या सुरक्षेसाठी शस्त्र वापरण्याचा परवाना पोलिस प्रशासन व जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयातून दिला जातो. दरवर्षी या शस्त्र परवान्याचे नूतनीकरण होत असले तरीदेखील संबधित व्यक्तीला शस्त्र परवान्याची गरज आहे का, कोणत्या कारणासाठी परवाना घेतला आहे याची सर्व माहिती घेतली जाते.

### किती जणांकडे परवाना ?

जुने परवाने
३५१

नवीन परवाने
१



### शस्त्र परवाना कसा काढाल?

१. फॉर्म भरून दिल्यानंतर त्या सोबत आवश्यक सर्व कागदपत्रे जोडून दिल्यानंतर कार्यालयामध्ये सादर करणे आवश्यक आहे. फॉर्म सादर केल्यानंतर काही दिवसांनंतर आवश्यक तपासणी केली जाते.

२. अर्जदारावर गुन्हा नोंद आहे का ही माहिती घेतली जाते. गुन्हेगार नोंद तपासणी केली जाते. पत्ता पडताळणी केली जाते. मुलाखत घेतली जाते. सर्व माहिती समाधानकारक भेटली जाते त्यावेळी परवाना दिला जातो.

वसईत अनेक प्रतिष्ठित व्यक्तींसह लोकप्रतिनिधी यांच्याकडे परवाने आहेत. पण नेमके कोणाकडे परवाने आहेत किंवा नगरसेविका, उद्योजिका, गृहिणींकडे आहे याची माहिती सुरक्षेच्या दृष्टिकोनातून देऊ शकत नाही.

\- पोलिस प्रशासन

### शस्त्र परवान्यासाठी कोणती कागदपत्रे हवी?

- शस्त्र परवान्यासाठी ओळखीचा आणि पत्त्याचा पुरावा द्यावा लागतो. पासपोर्ट साईज फोटो, मतदान ओळखपत्र, मागच्या तीन वर्षातील इन्कम टॅक्स रिटर्न याची पूर्ण माहिती द्यावी लागते.
- याशिवाय आपल्या भागातील दोन चांगल्या व्यक्तीकडून चारित्र्य प्रमाणपत्र, फिटनेस प्रमाणपत्र, शैक्षणिक प्रमाणपत्रे, जन्म प्रमाणपत्र.

### एकही अर्ज नाही

- आतापर्यंत आयुक्तालयात कोणत्याही महिलेने बंदुकीच्या परवान्यासाठी अर्ज केला नसल्याचे परवाना कक्षाच्या अधिकाऱ्यांनी 'लोकमत'ला सांगितले.
- आयुक्तालयात परवाना शाखा २७ डिसेंबर २०२० पासून सुरू झाली. पूर्वी जिल्हाधिकारी कार्यालयातून शस्त्र परवाने दिले जायचे.

Hello Vasai
Page No. 2 Jan 17, 2023
Powered by: ereleap.com

CS CamScanner

लोकमत

## गुन्हेगारीत सहभाग : घरे भाड्याने देण्यापूर्वी पोलिसांना कळवा

# नायजेरियन-बांग्लादेशींवर वॉच

लोकमत न्यूज नेटवर्क

**नालासोपारा :** मिरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयात विशेषतः वसई तालुक्यात व नालासोपारा शहरात नायजेरियन, बांगलादेशी आणि इतर परकीय नागरिकांचे वास्तव्य वाढत असून त्यांच्यामार्फत होणाऱ्या उपद्रवात वाढ होत आहे. या सर्वाला लगाम बसण्यासाठी पोलीस आयुक्त मधुकर पांडेय यांनी कंबर कसली असून परदेशी नागरिकांबाबतची मोहीम हाती घेतली आहे.

नायजेरियन आणि बांगलादेशी नागरिकांचे गुन्हेगारीचे वाढते प्रमाण पाहता या नागरिकांना घरे भाड्याने देण्यापूर्वी त्यांची माहिती स्थानिक पोलिसांना देणे बंधनकारक करण्यात आले आहे. तसे न केल्यास स्थानिक नागरिकांवर कलम १८८ प्रमाणे गुन्हा दाखल होणार असल्याचे पोलिसांनी सांगितले.



### पोलिसांना ही माहिती देणे बंधनकारक

- घर भाड्याने देणाऱ्या व्यक्तीने स्वतःहून पोलिसांना परकीय नागरिकांना घर भाड्याने दिल्याबाबत कळविणे.
- संबंधित व्यक्तीचा नुकताच काढलेला फोटो.
- मूळ गाव व देशाचा पत्ता पुराव्यासह देणे.
- संबंधित व्यक्ती ज्या घरात येणार आहे व ती कोणत्या दलालामार्फत येते त्या दलालाची संपूर्ण माहिती.
- संबंधित व्यक्तीसोबत त्याचे कुटुंबीय/ मित्र यांचा ग्रुप फोटो देणे.
- संबंधित व्यक्ती कोणत्या कारणामुळे इकडील भागात स्थलांतर करत आहे याचे कारण.
- नमूद परकीय नागरिकांचा वैध पासपोर्ट व व्हिसाची प्रत देणे

वसई तालुक्यातील नालासोपारा शहरामध्ये मोठ्या संख्येने नायजेरियन आणि इतर परकीय नागरिक वास्तव्यास आहेत. विरार, वसई, नालासोपारा, भाईंदर, मीरा रोडमध्ये स्वस्त दरात सदनिका उपलब्ध होत असल्याने या भागात त्यांचा ओढा वाढत आहे. याव्यतिरिक्त छुप्या पद्धतीने देखील परदेशी नागरिक वास्तव्य करत असल्याचे पोलिसांना निदर्शनास आले आहे. त्यातील अनेक नागरिक हे मादक पदार्थांच्या तस्करीत आणि लॉटरी फसवणुकीच्या गुन्ह्यात असल्याची माहिती पोलिसांनी दिली. त्यामुळे स्थानिक नागरिकांना याचा मोठ्या प्रमाणावर उपद्रव सहन करावा लागत आहे.

गुन्हेगारीवर आळा बसण्यासाठी पोलिस आयुक्तालयाने परदेशी नागरिकांबाबत मोहीम हाती घेतली असून, भाडेतत्त्वावर घरे घेणाऱ्यांसाठी नवीन नियमावली बनवली आहे. त्यानुसार गुन्हेगार आणि परकीय नागरिकांवर अंकुश ठेवण्यासाठी आयुक्तांनी मीरा-भाईंदर वसई-विरार आयुक्तालयात फौजदारी प्रकिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१)(२) अन्वये ९ फेब्रुवारीपर्यंत मनाई आदेश लागू करण्यात आला आहे.

परदेशी नागरिकाची शहानिशा करूनच घर, दुकाने, हॉटेल व जमीन भाड्याने देणे, रीतसर भाडे करार करू नजीकच्या पोलिस ठाण्या घरमालकाला माहिती दिल्याशिवा भाड्याने देऊ नये, असे आदे पोलिसांनी दिले आहेत. त्यासोब यापूर्वीही भाडेतत्त्वावर दिले असल्यास त्याची माहिती तत्का स्थानिक पोलीस ठाण्यात देण्या यावी, असेही आदेश आहेत. दरम्या स्थानिक नागरिकांकडून या नियमां भंग झाल्यास कलम १८८ प्रमा त्यांच्यावरही कडक कारवाई करण्या येणार आहे.



CamScanner